# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट

दिनांक ०७/०९/२०२२

**“ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध विभागाने स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी वेश्याव्यवसाय करवुन घेणाऱ्यांवर कारवाई करून ५ पिडीत महिलांची केली सुटका”**

मा. पोलीस आयुक्त श्री.अंकुश शिंदे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष हे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर कारवाई करण्याच्या अनुषंगाने गोपनिय माहिती काढत असताना दिनांक ०६/०९/२०२२ रोजी वाकड पोलीस स्टेशन हद्दीत स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी अवैधरित्या मुलींकडुन वेश्याव्यवसाय करुन घेणा-यांवर कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक ०६/०९/२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षातील पोलीस अधिकारी यांना वाकड पोलीस स्टेशन हद्दीत शॉप नंबर १७/५/१, साई सागर प्लाझा, साई चौक, जगताप डेअरी, पिंपळे सौदागर, पुणे येथील Castle नावाचे स्पा सेंटरमध्ये स्वतःचे आर्थिक फायदयाकरीता मुलींकडुन पैश्याचे आमिष दाखवुन वेश्या व्यवसाय करवुन घेतला जात आहे अशी माहिती मिळाली होती अशा मिळालेल्या माहितीवरुन बनावट ग्राहक पाचारण करुन पडताळणी करीता वर नमुद ठिकाणी सापळा रचुन छापा टाकुन पुरूष तसेच महिला आरोपींचे ताब्यातून एकुण **०५ पिडीत मुलींची** वेश्याव्यवसायातुन सुखरुप सुटका करण्यात आलेली आहे. घटनास्थळावरुन जप्त केलेल्या मुद्देमालाचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

१) ५०००/- रोख रक्कम
२) १४० रू कि.चे इतर साहित्य.
३) ८,०००/- रू कि.चा एक ओप्पो कंपनीचा मोबाईल फोन जु.वा.कि.अं

---

**एकुण १३,१४०/- रु. किं. चा मुद्देमाल** मिळुन आला म्हणुन **अटक आरोपी नामे** १) सिमा दिपक धोत्रे वय ३७ वर्षे रा. शिवप्रतिष्ठान गल्ली नंबर १,फेमस चौक, नवी सांगवी पुणे. **(स्पा चालक- मालक)** २) रमेश कुमार साहीराम वय २४ वर्षे रा. सद्या. स्पामध्ये मुळ पत्ता- वार्ड नं- ५ गाव- ३ एमके जि.गंगानगर,राज्य- राजस्थान **(स्पा मॅनेजर)** यांचे विरुध्द **वाकड पोलीस स्टेशन** गुरनं ७४० /२०२२ भा दं वि क ३७०(३),३४ सह अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५,७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास वाकड पोलीस स्टेशन करीत आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे सो, मा. अपर पोलीस आयुक्त डॉ संजय शिंदे सो, मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे),डॉ.काकासाहेब डोळे सो, मा.सहा.पोलीस आयुक्त(गुन्हे), डॉ.प्रशांत अमृतकर सो यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षातील पोलीस निरीक्षक श्री.देवेंद्र चव्हाण,पोउपनि प्रदिपसिंग सिसोदे,पोउपनि धैर्यशिल सोळंके,पोउपनि विजय कांबळे,पोलीस अमंलदार सुनिल शिरसाट, सुधा टोके, मारुती करचुंडे, भगवंता मुठे,वैष्णवी गावडे,रेष्मा झावरे यांनी केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड